# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ४९९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यलय, भंडारा
दिनांकः—१२/०८/२०१६.

**१) पैशासाठी मारुन जिवाने मारण्याची धमकी दिली . :—**

दिनांक १०/०८/२०१६ रोजी १४.४५ वा. दर. यातील फिर्यादीच्या पतीस आरोपी क्र.१ने उसनवाडी दिलेल्या पैशाची मागनी केली तेव्हा तिचे पतीने सध्या अडचन आहे तुमचे ३५,०००/—रू. नंतर परत करू असे बोलले असता संगनमत, भांडण करून आरोपी क्र. २ + ३ चे तिच्या पतीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करून घराचे समोर येवुन सार्वजनीक रोडवर निघुन आरोपी क्र. २ व ३ यांनी घरा सामोरील झाडे लावलेल्या दोन कुंडया फोडुन जर पैसे दिले नाहीतर तुमचा घर जाळुन जिवाने मारून टाकु अशी धमकी दिली. असे फिर्यादी सौ. सावित्रीबाई अर्जुन मडावी वय ५८ वर्ष रा. तलाव वार्ड साकोली यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४४८,२९४,५०६,३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १०/०८/२०१६ रोजी २२.३० वा. दर. यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीच्या घरासमोर जावुन आरोपी क्र. १ ने आपल्या पत्नीला घरी नेतो या कारणावरून भांडण करून फिर्यादीला अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली असे फिर्यादी सुशिलाबाई मोतीराम बावने वय ६६ वर्ष रा. हनुमान नगर तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २९४,५०६,३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाने पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**३) शस्त्र घेवुन मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ११/०८/२०१६ रोजी २१.०५ वा. दर. यातील फिर्यादी हे पो. स्टे. ला हजर असतांना पो. स्टे. फोन व्दारे माहीती मिळाली कि १ इसम हा आपल्या हातात शस्त्र जवळ बाळगुन असल्याचे व त्यास काही इसम धक्काबुकी करीत आहेत अशा खबरेवरून फिर्यादी हे स्टॉपसह रवाना झाले असता यातील आरोपी जोराने ओरडत असतांना मिळुन आल्याने त्याची पंचासह झडती घेतली असता त्याचे जवळ १ धारदार पांढ—या धातुचा चाकु (शस्त्र) कि. १००/—रू. बाळकतांना मिळुन आल्याने मा. जिल्हाधीकारी सा. भंडारा याचे क्र. ३७(१)(३) मपोका. आदेशाचे उल्लंघन केल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी. राऊत यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४/२५ भा.ह.का. सहकलम १३५ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. खंडाते वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–

दिनांक १२/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १५६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा–यांवर ०२ केस, तिन सिटर वाहनांवरती १७ केसेस व इतर वाहनांवरती १३७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

( श्री.एस. घुसर )
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५६११९११

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.